पशुचिकित्सा

# जनावरांच्या आरोग्यासाठी औषधी वनस्पती

**प्रणिता सहाणे**
सहायक प्राध्यापक
ए.बी.एम. कॉलेज, गुंजाळवाडी पठार,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर



जनावरांच्या स्वास्थ्यासाठी औषधी वनस्पतींचा उपयोग हा प्राचीन काळापासून केला जात आहे. जनावरांच्या वाढीसाठी तसेच रोगप्रतिकारक शक्ती, दूध उत्पादन वाढविण्यासाठी आणि रोग कमी करण्यासाठी कृमीनाशक व कफनाशक म्हणून औषधी वनस्पती वापरतात.

शरपुंखा (उन्हाळी), भुई आवळी (भूआमली), तुळस, अश्वगंधा, शतावरी, कडूनिंब, कंबरमोडी, मेंदी यासारख्या अनेक औषधी वनस्पती आपल्या अवतीभोवती असतात त्यांचा उपयोग योग्य प्रमाणात केल्यास आपल्याला जनावरांचे स्वास्थ्य चांगले ठेवण्यास नक्कीच मदत होईल.

१) तुळस

**औषधी उपयोग:** रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी (कोंबड्यांमध्ये विशेष उपयोगी)



**कोणत्या जनावरांना वापरावी :** शेळ्या व कोंबड्या

**कोणत्या प्रकारे वापरावी :** तुळशीच्या वाळविलेल्या पानांची भुकटी.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा :** शेळ्या : रोज ४ ग्रॅम ३ दिवस, कोंबड्या : रोज २ ग्रॅम प्रत्येकी १ किलो खाद्यातून दोन आठवडे.

२) शरपुंखा

**औषधी उपयोग :** अशक्तपणा दूर करून वजन वाढीसाठी.



**कोणत्या जनावरांना वापरावी :** वासरे, शेळ्या, मेंढ्या.

**कोणत्या प्रकारे वापरावी :** वाळवलेल्या पानांची भुकटी खाद्यातून.

**प्रकार / पद्धत / मात्रा :** रोज १० ग्रॅम खाद्यातून ६० दिवस.

३) भुई आवळी (भूआमली)

**औषधी उपयोग :** अशक्तपणा, यकृत विकार दूर करून भूक प्रज्वलित करणे.

रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी

**कोणत्या जनावरांना वापरावी :** गाई, म्हशी, बैल, वासरे, शेळ्या, मेंढ्या.



**कोणत्या प्रकारे वापरावी :** वाळविलेल्या वनस्पतीची भुकटी खाद्यातून.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा :** मोठी जनावरे : रोज ३० ग्रॅम, वासरे, शेळ्या : ६ ते ८ ग्रॅम ३० ते ६० दिवसापर्यंत

४) अश्वगंधा

**औषधी उपयोग :** नवजात वासरास रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करून अपमृत्यू टाळण्यासाठी.



**कोणत्या जनावरांना वापरावी :** गाई म्हशींची ३ ते ४ आठवडे वयांतील वासरे.

**कोणत्या प्रकारे वापरावी :** अश्वगंधा वनस्पतीच्या मुळांची वाळविलेली भुकटी.

**प्रकार / पद्धत / मात्रा :** नवजात वासरे : रोज ३ ग्रॅम याप्रमाणे ६० दिवसांपर्यंत.

५) शतावरी

**औषधी उपयोग :** गाई- म्हशींमधील दूध वाढविण्यासाठी.



**कोणत्या जनावरांना वापरावी :** गाई म्हशी (दुभती).

**कोणत्या प्रकारे वापरावी :** शतावरी वनस्पतीच्या वाळविलेल्या मुळांची भुकटी.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा :** रोज ३० ग्रॅम सकाळी व ३० ग्रॅम सायंकाळी खाद्यातून दूध देत असेपर्यंत.

६) कंबरमोडी

**औषधी उपयोग :** मोठ्या जनावरातील किंवा शेळ्या मेंढ्यांतील पोटफुगी दूर करण्यासाठी.



**कोणत्या जनावरांना वापरावी** : गाई, म्हशी, बैल, शेळ्या, मेंढ्या.

**कोणत्या प्रकारे वापरावी** : पानांचा रस.

**प्रकार / पद्धत / मात्रा** : मोठी जनावरे : १०० मि.लि.

लहान जनावरे : ३० मि.लि.

७) **मेंदी**

**औषधी उपयोग** : सांधे सूज, पायांतील लचक.



**कोणत्या जनावरांना वापरावी** : बैल व इतर मोठी जनावरे

**कोणत्या प्रकारे वापरावी** : हिरवा पानांचा ठेचा किंवा रस.

**प्रकार / पद्धत / मात्रा** : खांदे सूज असलेल्या जागी चोळावा.

८) **कडूलिंब**

**औषधी उपयोग** : १) कोंबड्यामध्ये रोग प्रतिकारक शक्ती व वजन वाढ होण्यासाठी २) वासरातील खरूज नाहीशी करण्यासाठी ३) वासरातील अशक्तपणा दूर करण्यासाठी



**कोणत्या जनावरांना वापरावी**: १) कोंबड्या (ब्रॉयलर) २) वासरे (गाई, म्हशी) ३) वासरे (गाई, म्हशी)

**कोणत्या प्रकारे वापरावी** : १) वाळविलेल्या पानांची भुकटी २) पानांचा रस पांढऱ्या व्हॅसेलिनमध्ये मिसळून (१:१० या प्रमाणात) मलम या स्वरूपात ३) वाळविलेल्या पानाची भुकटी.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा**

१) २ ग्रॅम भुकटी प्रत्येकी १ किलो खाद्यातून दररोज २) खजूर असलेल्या जागी मलम चोळावा. ३) रोज २० ग्रॅम खाद्याद्वारे २ ते ३ आठवडे

९) **हिंग**

हिंग हा फेरुला फोइटिडा या वनस्पतीच्या मुळाचा रस सुकवून त्यापासून बनविलेला एक पदार्थ आहे. पूड व अर्क या स्वरुपात करतात. याला पिवळसर तपकिरी रंग असून तीव्र वास व चव असते.



**औषधी उपयोग**: १) याचा उपयोग जंतूनाशक आणि दुर्गंधीनाशक म्हणून करतात. २) तसेच वायुसारक, कृमिनाशक, उत्तेजक, कफ पातळ करणारा, पोटफुगी व अपचन झाल्यास ३) पोटदुखी व श्वसनसंस्थेच्या दाहामध्ये .

**कोणत्या जनावरांना वापरावी:**

मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी**: पावडर व द्रावण स्वरुपात.

**प्रकार / पद्धत / मात्रा:**

| जनावरे | पावडर (ग्रॅम) | द्रावण (मि.ली.) |
|---|---|---|
| मोठी जनावरे | १५ ते २० ग्रॅम | १५ ते २० मि.ली. |
| लहान जनावरे | १० ते १५ ग्रॅम | ५ ते १० मि.ली. |

१०) **सुंठ (आले)**

**औषधी उपयोग:**



१) आले सुकवून सुंठ तयार करतात.

२) उत्तेजक, लाळवर्धक, जठरस्रावववर्धक

**कोणत्या जनावरांना वापरावी** :

मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी:** सुंठ पावडर किंवा द्रावण स्वरुपात वापरावी.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा:**

| जनावरे | पावडर (ग्रॅम) | द्रावण (मि.ली.) |
|---|---|---|
| मोठी जनावरे | १५ ते ३० ग्रॅम | ३० ते ४० मि.ली. |
| लहान जनावरे | ०५ ते १० ग्रॅम | १ ते २ मि.ली. |

११) **लसूण**

**औषधी उपयोग:** १) लसणामध्ये वायुसारक, पाचक आणि शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होण्यास उपयुक्त घटक. २) पोटफुगी व पोटदुखीमध्ये याचा उपयोग.



**कोणत्या जनावरांना वापरावी :** मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी :** लसणाच्या पाकळ्याची पेस्ट

**प्रकार/ पद्धत/ मात्रा:**

| जनावरे | पेस्ट (ग्रॅम) |
|---|---|
| मोठी जनावरे | १० ग्रॅम |
| लहान जनावरे | ०५ ग्रॅम |

१२) **मोहरी**



**औषधी उपयोग :** १) सांधे दुखीवर लेप म्हणून उपयोग. २) श्वसनसंस्थेच्या दाहात पचनसंस्था सुधारणारी, कफ पातळ करण्यास उपयुक्त. ३) जठर वर्धक उत्तेजक, वायुसारक आणि प्रती दाहकारी

**कोणत्या जनावरांना वापरावी :** मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी :** तांबूस, काळपट, बारीक, दाण्याच्या स्वरुपात उपलब्ध. पावडर स्वरुपात वापरावी.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा:**

| जनावरे | पेस्ट (ग्रॅम) |
|---|---|
| मोठी जनावरे | १० ग्रॅम |
| लहान जनावरे | ०५ ते ०८ ग्रॅम |

१३) **जेष्ठमध**

**औषधी उपयोग :** १) कफ पातळ करणारे, पाचक आणि पुष्टीवर्धक २) श्वसनसंस्थेच्या दाहात वापरतात.



**कोणत्या जनावरांना वापरावी :** मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी :** झाडाच्या खोडाची पावडर.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा :** जनावराच्या वयानुसार मोठ्या जनावरांना १०-१२ ग्रॅम या प्रमाणात द्यावी व लहान जनावरांना ८-१० ग्रॅम प्रमाणात द्यावी.

१४) **बडीशोप**

या झाडाचे फळ औषधी असून त्यापासून एक प्रकारचे तेल मिळते व त्याचा वापर औषधी म्हणून करतात. बडीशोप ही तेल, द्रावण व पावडर स्वरुपात उपलब्ध असते.



**औषधी उपयोग :** १) परोपजीवी नाशक २) कफनाशक, वमनकारी, वायुसारक म्हणून ३) पक्ष्यांमध्ये व कुत्र्यांमध्ये उवा, पिसवा यांचा नाश करण्यासाठी बडीशोप तेल मिसळले जाते. ४) वायुसारक असल्याने अपचन असेच कफ पातळ करण्यासाठी व चाटण औषधीमध्ये बडीशोपचे तेल वापरतात.

**कोणत्या जनावरांना वापरावी :** मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि

मेंढी).

**कोणत्या प्रकारे वापरावी** : पावडर, तेल आणि द्रावण

**प्रकार/ पद्धत/ मात्रा :**

| जनावरे | पावडर | द्रावण (मि.लि.) | तेल (थेंब) |
|---|---|---|---|
| मोठी जनावरे | ३० ते ६० ग्रॅम | २० ते ३० मि.लि. | १५ ते ४० थेंब |
| लहान जनावरे | १० ते २० ग्रॅम | ८ ते १२ मि.लि. | १० ते १५ थेंब |

१५) **अफू**

अफूमध्ये मार्फिन हे औषधी द्रव्य असते. यात मॉर्फिन हायड्रोक्लोराईड हे संयुग वापरले जाते. हे औषध विषारी आहे.



**औषधी उपयोग :** १) अतिसारामध्ये द्रावण स्वरुपात चांगला उपयोग होतो. २) गर्भाशय किंवा योनीमार्गामध्ये वेदना होत असल्यास त्या कमी करण्यासाठी उपयोग ३) लाळवर्धक, जठरस्रावरोधक, मज्जासंस्थेवर प्रथम उत्तेजक, नंतर संवेदनाहारी, वेदनाशामक, निद्राकारी, वमनकारी.

**कोणत्या जनावरांना वापरावी:**

मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी).

**कोणत्या प्रकारे वापरावी** : पावडर व द्रावण स्वरुपात

**प्रकार/ पद्धत/ मात्रा:**

| जनावरे | पावडर (ग्रॅम) | द्रावण (मि.ली.) |
|---|---|---|
| मोठी जनावरे | ८ ते १२ ग्रॅम | ३० ते ६० मि.ली. |
| लहान जनावरे | १ ते १५ ग्रॅम | २ ते ८ मि.ली. |

१६) **ओवा**

**औषधी उपयोग** : १) बारीक गोल दाणे असलेली, करड्या रंगाची तिखट पाचक वायुसारक २)पोटदुखी व अपचन झाल्यास उपयोगी ३) कफनाशक.



**कोणत्या जनावरांना वापरावी** : मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी** : पाण्यामध्ये भिजवून

**प्रकार/ पद्धत/ मात्रा:**

| जनावरे | ओव्याचे दाणे (ग्रॅम) |
|---|---|
| मोठी जनावरे | ८ ते १२ ग्रॅम |
| लहान जनावरे | १ ते १५ ग्रॅम |

१७) **कात**

**औषधी उपयोग** : १) काताचा उपयोग रक्तस्रावरोधक, लाळस्तंभक, अन्ननलिकेचा दाह, हिरड्यांची सूज कमी करण्यासाठी २) अल्सर, अतिसार यामध्ये संरक्षक व शामक म्हणून उपयोगी.

**कोणत्या जनावरांना वापरावी** : मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी** : पुड, द्रावण आणि खड्याच्या स्वरुपात.

**प्रकार/ पद्धत/ मात्रा:**

| जनावरे | पूड व खड्याच्या स्वरुपात |
|---|---|
| मोठी जनावरे | २० ते ३० ग्रॅम |

१८) **नक्स ओमोका (कुचला)**

* ही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. ‘कुचलिया वृक्षाची फळे मधुर कैसी असतील’ असे ज्ञानेश्वर मराठीत म्हणून गेले आहेत. या वनस्पतीची फळे कडू असतात.

* पशुवैद्यकीय औषधीशास्त्रात अतिशय महत्त्वाचे औषध.

* त्यामध्ये स्ट्रायचिन (Strychnine) आणि ब्रुसीन (Brusine) ही औषधी द्रव्ये असतात.

* अतिशय विषारी औषध असून याचा वापर पूड व अर्क या स्वरुपात व अतिशय कमी प्रमाणात वापरतात.

* हे औषध बाह्य उपचारासाठी वापरत नाही.

**औषधी उपयोग** : १) चवीला कडू असल्यामुळे

अप्रत्यक्षपणे जठरस्राव वाढवतो. २) भूक वाढवून पचनक्रिया सुधारते. ३) मज्जासंस्थेवर या औषधाची क्रिया वाढून रक्तदाब व श्वसन वेग वाढतो. ४) हे औषध नॉर्व्हिन टॉनिक (Nervin tonic) असून कफनाशक आणि पुष्टीवर्धक (पचनक्रिया सुधारणारा) पूड आणि द्रावण या स्वरुपात असते.

५) क्लोरेल हायड्रेट या औषधाचा विषबाधेवर उतारा म्हणून वापरतात.

**कोणत्या जनावरांना वापरावी** : मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)


**कोणत्या प्रकारे वापरावी** : पावडर (पूड) आणि अर्क

**प्रकार/ पद्धत/ मात्रा :**

| जनावरे | पावडर (ग्रॅम) | द्रावण (मि.लि.) |
|---|---|---|
| मोठी जनावरे | ४ ते ८ ग्रॅम | १० ते १५ मि.लि. |
| लहान जनावरे | २०० मि.ग्रॅम | ५ ते १० मि.लि. |

१९) **बेलाडोना**

या वनस्पतीत ॲट्रोपिन, हायसिक्रिमिन बेलाडॉमिन अशी औषधी गुणद्रव्ये असतात.



**औषधी उपयोग** : १) डोळ्यातील बाहुल्या प्रसरण पावतात. २) लाळ कमी होते, श्वसन वेग वाढतो त्याचबरोबर हृदयाची स्पंदने वाढविली जातात. ३) बेलाडोना वायुसारक असून अफूमुळे विषबाधा झाल्यास त्यावर उतारा म्हणून उपयुक्त ४) नाकातून रक्त येत असल्यास रक्तावरोधक म्हणून वापर

**कोणत्या जनावरांना वापरावी** : मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी** : बेलाडोना हे औषध पुड, द्रावण व मलम या तीनही स्वरुपात उपलब्ध आहे.

प्रकार/ पद्धत/ मात्रा:

| जनावरे | पावडर (ग्रॅम) | द्रावण (मि.ली.) |
|---|---|---|
| मोठी जनावरे | १० ते १५ ग्रॅम | १५ ते ३० मि.ली. |
| लहान जनावरे | ८ ते १० ग्रॅम | १० ते १५ मि.ली. |

ॲट्रोपिन-सल्फेट (Atropin Sulphate) या नावाने बाजारात खूप इंजेक्शन उपलब्ध आहेत.

| जनावरे | इंजेक्शन (मि. ग्रॅम) | |
|---|---|---|
| मोठी जनावरे | १५ ते ३० मि. ग्रॅम | कातडीखाली |
| लहान जनावरे | ८ ते १० मि. ग्रॅम | कातडीखाली |

२०) **तंबाखू**

तंबाखूच्या पानामध्ये निकोटिन नावाचे अल्कलाईड असते.

**औषधी उपयोग** : १) मज्जातंतू उत्तेजित करण्यासाठी



२) रक्तदाब वाढतो, नाडीचा वेग कमी होतो, हृदयाची स्पंदने वाढतात. ३) जनावरांच्या शरीरातील कृमींचा नाश करण्यासाठी खालील मिश्रण वापरतात.

तंबाखूची पाने - ४५० ग्रॅम, गंधक- ४५० ग्रॅम आणि पाणी २ ते ३ लिटर. हे सर्व २४ तास पाण्यात ठेवून हे तयार झालेले पाणी त्वचारोगावर उपयोगी आहे.

४) खरुज, गजकर्ण, नायटा इत्यादी रोगावर उपयुक्त ५) स्ट्रायचिन (Strychnine) विषबाधेवर उतारा म्हणून वापरतात. ६) कृमीनाशक जंतनाशक म्हणूनही वापरतात.

**कोणत्या जनावरांना वापरावी :**

मोठी जनावरे (गाय, बैल, म्हैस) व लहान जनावरे (शेळी आणि मेंढी)

**कोणत्या प्रकारे वापरावी :**

झाडाची पाने बारीक करून औषध म्हणून वापरावी.

**प्रकार/ पद्धत/मात्रा** : जनावरांच्या आवश्यकतेनुसार त्यांना औषधाची मात्रा द्यावी.

**(*या सर्व औषधी वनस्पती तसेच लेखात सुचविलेल्या इतर औषधांचा उपयोग संबंधित पशुतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार करणेच हिताचे आहे.)**